2018 -19



Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL


# AJANTA


Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta
Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - II January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

## EDITORIAL BOARD


**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Kalyan Laghane**
Principal,
Dagdojirao Deshmukh Arts, Commerce
& Sciencce College, Waluj, Aurangabad.

**Dr. Sadashiv Sarkate**
Associate Professor and Head Dept.of Marathi
Shivaji College, Gadhi, Tq. Georai, Dist. Beed.

**Dr. Yuvraj Dhabadge**
Associate Professor and Head Department of Marathi
Dagdojirao Deshmukh Arts, Comm.
& Sciencce College, Waluj.

**Dr. Sarjerao Jige**
Associate Professor
Dept. of Marathi
Pratishthan College, Paithan.

**Mr. Nagesh Bontewad**
Assitant Professor, Department of Marathi
Dagdojirao Deshmukh Arts, Comm.
& Sciencce College, Waluj, Aurangabad.

**Dr. Subhash Bagal**
Associate Professor and Head Dept.of Marathi
Chistiya College, Khultabad.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | ग्रामीण साहित्याचे स्वरुप (संदर्भ - वेदनेचा गाव)<br>**प्रा. गजलवार रमाकांत काळबाराव**<br>**प्रा. कातकडे केशव श्रीरंग** | १-६ |
| २ | नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा<br>**प्रा. ममता राऊत** | ७-११ |
| ३ | शेतकऱ्यांचे हिरवे दु:ख : अवकाळी विळखा<br>**भारत चिंतामणी बंडगर** | १२-१८ |
| ४ | १९९० नंतरच्या निवडक ग्रामीण कादंबरीची आशय सूत्रे<br>**प्रा. राधाकिसन पांडूरंग मुठे** | १९-२१ |
| ५ | ग्रामीण कथासंग्रह कोंबऱ्या (लेखक - बा. सी. जठार)<br>**डॉ. संजय शामराव पाटोळे** | २२-२८ |
| ६ | दलित आत्मकथा : संकल्पना व स्वरूप<br>**डॉ. युवराज धबडगे**<br>**राहूल संभाजी पंडित** | २९-३१ |
| ७ | अरुण काळे यांच्या कवितेतील जागतिकीकरणाचे प्रतिबिंब<br>**प्रा. अरविंद आसाराम भराडे** | ३२-३४ |
| ८ | ग्रामीण साहित्य : १९६० नंतरची ग्रामीण कविता आणि सद्यस्थितीतील ग्रामीण कवितेचे चित्रण<br>**प्रा. गायकवाड मारोती गोविंदराव** | ३५-३९ |
| ९ | दलित कांदबरीतील वैचारिक लेखन<br>**राजनंदिनी कैलास भालेराव** | ४०-४५ |
| १० | औरंगाबाद शहरातील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा संविधानातील मानवी अधिकार विषयक जागरुकतेचा अभ्यास<br>**रेखा केशवराव बावणे**<br>**डॉ. मोईन फातेम** | ४६-५० |
| ११ | मराठवाड्यातील दलित कवितेची सद्यस्थिता<br>**प्रा. राजा जगताप** | ५१-५७ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ८. ग्रामीण साहित्य : १९६० नंतरची ग्रामीण कविता आणि सद्यस्थितीतील ग्रामीण कवितेचे चित्रण

**प्रा. गायकवाड मारोती गोविंदराव**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ.

मानवी जीवनात साहित्याची भूमिका महत्वाची ठरते. कारण साहित्य हे मानवी जीवनाच्या जाणीव नेणिवेतून निर्माण होणारे रुप आहे. समाजाने निर्मिलेला सांस्कृतिक अंतर्विरोध साहित्य निर्मितीला कारण ठरत असते. तसेच १९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण भागातील खेडयातील माणूस शिक्षण घेतल्यानंतर तो शेतीनिष्ठ जीवन जगताना आपल्याला आलेले अनुभव कथन करताना कृषि संस्कृतीचे दर्शन व त्यावर अवलंबून असलेला शेतकरी त्याचे गाव शिवाराशी असणारे नाते मराठी साहित्यात आले ते म्हणजे ग्रामीण साहित्य होय.

ग्रामीण साहित्याची चळवळ ही आधुनिक काळात बहिणाबाईंच्या काव्यापासून आली असली तरी आनंद यादवांनी ती ग्रामीण साहित्याची चळवळ रुजवली. त्यानंतर मराठीतील र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ, शंकर पाटील, सदानंद देशमुख, नागनाथ कोतापल्ले, यासारखे अनेक साहित्याकांनी मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे संवेदनशील मनाने खेडयातील माणसांचे दुःख, दारिद्रय, रुढीपंरपरा, संस्कृती व गाव पातळीवरील राजकारण आपल्या साहित्यातून अधोरेखित केले आहे. ते करत असताना खेडयातील माणसांची बोली त्यांच्या साहित्याला जिवंतपणा देऊन जाणारी आहे. त्या माणसाचे जीवन, गुरे -ढोरे, शेत -शिवार यांच्याशी नाते जोडत जोडत मराठी साहित्यात ग्रामीण साहित्य कथा,कविता कादंबरी व इतर साहित्य प्रकार निर्माण करुन ग्रामीण [illegible] ...त्य समृद्ध केले आहे.

ग्रामीण साहित्य हे मुलतः निर्माण झाले त्यामध्ये विशिष्ट भूभागाशी आपले नाते जोडताना आपल्या जीवनातील ग्रामीण अनुभूतीतून जन्माला आले. ही ग्रामजीवनाची अनुभूती त्या विशिष्ट प्रदेशातील जीवन पद्धती, रुढी पंरपरा, रीतिरिवाज, शेती, निसर्ग व मातीशी त्यांचा येणारा संबंध आपल्या साहित्यातून संस्कृती दर्शनासह सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकारण इत्यादी [illegible] वास्तवपणे साहित्यातून मांडण्याचे कार्य केले असे हे ग्रामीण साहित्य मराठी माणसाच्या जीवनाचे वास्तव अनुभूतीतून चित्रण करणारे साहित्य निर्माण झाले आहे.

मराठी ग्रामीण साहित्यात कथा, कांदबरी, वाडमय प्रकारापेक्षा 'कविता' हा वाड्मय प्रवाह मराठी साहित्यात वेगळेपणाबरोबरच संवेदनशील मनाने आत्मआविष्काराचे रुप धारण करणारे कविता ग्रामीण साहित्यात आले. आत्मनिष्ठ काव्याच्या स्वरुपात प्रतिमांची भाषा व बोलीभाषेच्या दर्शनामुळे ते साहित्य वेगळया स्वरुपात मनावर बिंबवले आहे. मराठी कवितेत बहिणाबाई चौधरींच्या कवितेतून शेतकरी व शेतीनिष्ठ जीवन त्यांच्या कवितेतून पाहयाला मिळते. त्यानंतर मराठी साहित्यात अनेक ग्रामीण कवी ग्राम जीवनाची अनुभूती घेऊन ग्रामीण कविता लेखन केले आहेत. या ग्रामीण कविच्या

कवितेतील ग्रामजीवन, संस्कृती, रीतिरिवाज, गावातील शेतीवर राबराब राबणारी माणसे, त्यांच्या वेगवेगळया रुपांचे कवितेच्या रुपाने ग्रामीण कवितेने मांडले आहे.

मराठीतील ग्रामीण साहित्यिक ना.धों. महानोर यांच्या कविता मुख्यतः निसर्गाशी संबंधित आहेत.पण त्या नुसत्या निसर्गाशी नाते जोडत नाहीत तर आपल्या आत्मनिष्ठ अनुभूतीतून निर्माण झालेल्या कविता अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत. महानोरांच्या 'रानातल्या कविता' त्या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातील कविता निसर्ग कवितेच्या रुपाने जनमाणसावर गारुड केले आहे. या कविता संग्रहातून आपल्या जीवनातील वैयक्तिक प्रसंगाची, आगतिक झालेल्या शेतकऱ्यांची, सरकारने विचारलेल्या जाबाची, चित्रपटातून लिहिलेल्या गाण्यांची व शेवटी अनंतात विलिन होवू पाहणाऱ्या अस्तिक भक्तांची वेगवेगळया जाणीवा घेऊन प्रत्येक कविता एक जीवनाचा वेगळा रंग घेऊन येत असले तरी मराठी वाचक त्या कवितेला आपल्या जीवनाशी नाते जोडताना पाहेयला मिळते. जसे की, 'पानझड' कवितेतून महानोरांनी दारिद्रय जीवनाचे चित्रण करताना कवितेत लिहितात.

'सूर्य नारायना नित नेमानं उगवा
अंधाराच्या दारी थोड उजेड पाठवा
मोडक्या घरांच्या बिंद्रावनाशी सांजेला
दिव्याच्या आधार जडो त्यांच्या संसाराला'

या कवितेतून महानोरांनी शेतकरी जीवनाला दारिद्रयातून बाहेर पडून आशावादी जीवनाच्या दिशेने तो गेला पाहिजे दुर्दम्य आशावाद व्यक्त केला आहे. म्हणून महानोरांची कविता निरास नाही, उदास नाही तर मानवी जीवन प्रलग्भतेकडे घेऊन जाणारी आहे किंवा महानोरोंनी शेतकऱ्यांच्या दुखाचे चित्रण करताना रानातली झाडे यासारखी उपमा शेतकरी जीवनाला देताना महानोरांनी आपल्या कवितेत परकेपणांची जाणिव व्यक्त केली आहे.अशा पद्धतीने महानोर आपल्या कवितेत शेतकरी जीवनाचे दुख गातांना त्यांचे मन व डोळे भरुन आलेले पाहायला मिळतात. जशी रानतील झाडे फुले अंथरुन एकटीच असतात तसे शेतकऱ्यांचे जीवन शेतीत राबराब राबत घामाचे थेंब गाळत आपले दुःख मनात ठेऊन जगताना पहायला मिळतात. अशा पद्धतीने महानोरांनी आपल्या कवितेतून शेतकऱ्यांचे दुख चित्रित केले आहे. महानोरांनी आपल्या कांही कवितामधून निसर्गाशी मानवी जीवनाशी नाते जोडताना ते म्हणतात,

''गुंतलेले प्राण हया रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आंनदुनी बेहोष होता
शब्दगंधे तू मला बाहुत घ्यावे''

अशा कवितेतून महानोरांनी शेतातील सृष्टी व मानवी जीवन एकरुप असल्याने शेती, पिकांचा,झाडांचा तिथल्या जीवनाचा माझा एकसंध असा भाव कवितेत मांडलेला आहे. महानोरांनी दुष्काळ, शेतीची उद्धस्तता यात तोचतोचपणा टाळला व घट्टपणाने आपल्या कविता निर्माण करुन ग्रामीण भागतील दुष्कांळाचे वर्णन अतिशय संवेदनशील मनाने केले आहे.

अलिकडच्या काळात ना.धो.महानोर यांच्याशी नाते जोडणाऱ्या इंद्रजित भालेराव हे ग्रामीण मराठी साहित्यात ग्रामीण कवी म्हणून आपले नाव अधोरेखित केले आहे.भालेराव यांच्या कवितेत मराठवाडयातील शेतकरी जीवनाचे चित्रण आले आहे. त्यांची कविता मराठवाडा प्रदेशाचे अनुभव विश्व साकार करणारी आहे. तेथील रुढी परंपरा, संस्कृती,भाषा, लोकमानस, शेती - शिवार यावर काम करणारी माणसे व त्यांचे जगणे त्यांच्या कवितेतून जाणवते.

इंद्रजित भालेराव यांच्या 'पीकपाणी' या पहिल्या कविता संग्रहात शेतकरी जीवनाच्या वाटेला येणारे दुःख, दारिद्रय, दुष्काळ अशा संकटांना सामोरे जाताना शेतकऱ्याला जगावे लागणारे हतबलतेचे जीवन आपल्या कवितेतून मांडले आहे. त्यांच्या कवितेत गावाकडेची माणसे चित्रित केले आहेत. खेडे, शेती शिवार, गुरे- ढोरे त्यांच्या जगण्याच्या पद्धती, त्यांना सोसावे लागणारे दुख, दैन्य, दारिद्रय यामुळे त्यांचे जीवन भालेरावांच्या जाणीवेचा भाग म्हणून कविता निर्माण झाल्या आहेत. त्यांच्या कवितेतून या व्यवस्थे विरोधात माझा शेतकरी लढत लढत जगायला शिकला पाहिजे असा विचार कवितेतून मांडला आहे.

'शीक बाबा शीक लढायला शीक

कुणबाच्या पोरा लढायला शीक'

या ग्रामीण कवितेतून व्यवस्थे विरोधात बंड करुन विद्रोह करणारी कविता निर्माण केली. हे कुणब्याच्या म्हणजे शेतकरी मुलाला आपल्यातील लाजरेपणा काढून टाकला पाहिजे. मुकाटपणे आत्महत्या करणे सोडून लढायला शिका व येथील व्यवस्था ही शेतकऱ्यांच्या विरोधात आहे म्हणून भांडवलदार राजकारणांना धडा शिकविणारी कविता भालेरावांनी निर्माण केली आहे.

इंद्रजीत भालेरांवाची दुष्काळाचे हृदयद्रावक चित्रण करणारी कविता आहे. शेतकरी निसर्गावर अवलंबून शेती केल्यामुळे त्यांच्या वाटेला दुख आले व त्यांची उपासमार होऊन ते अश्रू ढाळताना दिसते. ते एका कवितेत म्हणतात.

'गूळकरडीचा भात आई

पकान्न म्हणून शिजवयाचे

दुष्काळातील गोष्टी सांगून

डोळे आमचे भिजवायची'

यासारख्या कवितेतून आई मुलांचे नाते दुष्काळीची आठवण सांगताना पाहायला मिळाली आहेत. त्यांच्या जीवनात वाटेला येणारे करुण अवस्थेचे चित्रण भालेरावांनी आपल्या कवितेतून करुन दिले आहे.

भालेरावांची कविता जसे निसर्गावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांचे वर्णन करतात तसे आम्ही 'काबाडाचे धनी'या

कवितेत

'मातीसाठी जगावं

मातीसाठीच मरावं

बाळा माती लई थोर

तिला कसं इसरावं'

या कवितेतून मातीची थोरवी गाताना या मातीनेच तुला जगावले आहे. तुझ्या जीवनाच्या वाटेत तिने खरी वाटेकरी म्हणून भूमिका निभावली आहे. माती आणि शेतकऱ्यांचे दृढ नाते संबंध अधोरेखित केले आहे. असा हा कवि आत्मनिष्ठेने कविता लिहिताना प्रत्यक्ष भोगलेले आणि पाहिलेले शेतकरी जीवनाचे वास्तव त्यांच्या कवितेचे केंद्रबिंदू ठरले आहे.

भालेरावांच्या कवितेत जसे शेतकरी जीवनाचे दुख आले त्या बरोबरच शेतकरी हा देशाचा कणा आहे असे तत्वज्ञान सांगणाऱ्या कविता ही पीकपाणी कविता ६. या कवितेतून ते मांडले आहे. अशा कवितेतून जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी कृषी प्रधान व्यवस्थेत कणा मानला जातो पण तोच शेतकरी दुष्काळामुळे तर कधी इतर कारणामुळे तो मोडून पडला तरी महात्मा फुलेंच्या अखंडातील काव्याप्रमाणे 'निर्मिक' शब्दावरुन फुलेंच्या तत्वज्ञान विचाराची बांधिलकी निर्माण करणारी कविता पहावयास मिळते.

इंद्रजित भालेरावांच्या कवितेतून शेतकरी दारिद्रयाने जर्जर झालेला, फाटक्या तुटक्या कपड्यात असणारा, उपासपोटी झोपणारा, नैसर्गिक आपत्तीमुळे कर्जात बुडालेला, त्यामुळे कुटूंबाची अपेक्षा कधीच पूर्ण न केल्यामुळे उभी हयात दुखी जीवन जगणारा शेतकरी आपल्या कवितेतून काळी पांढरीच्या सभोतालच्या सुख- दुःखातून इंद्रजित भालेरावांनी आपली कविता मांडली आहे. त्यांच्या कवितेतून माती व माणूस, माणूस व जनावरे , माणूस व निसर्ग, माणूस व संस्कृती इत्यादीमधील असणारे दृढ संबंध स्पष्ट करणारी कविता आहे. त्यांची कविता शेतकरी जीवनाच्या दुखाचे चित्रण करते असे नाही तर ग्रामीण भागातील संस्कृतीतील सण उत्सवामुळे आनंद लहरीचे चित्रण करणारी कविता ही आहे. मानवी जीवनातील ग्रामीण भागातील नाते संबंधाचे (कौटुंबिक संदर्भ) देऊन त्यांच्या कविता अवतरली आहे. तेवढेच नाहीतर ग्रामीण भागातील शेतकरी पती पत्नीचे प्रेम अतिशय श्रृंगारपूर्ण पद्धतीने वर्णन आलेल्या कविता आहेत.

मराठी साहित्यात ग्रामीण कवितेने अलिकडच्या काळात सद्यस्थितीत अनेक नवीन ग्रामीण कवि शेतकरी व त्यांचे बदलणारे जीवन चित्रण काळाच्या ओघाबरोबर त्यांच्या कवितेचे संदर्भ ही बदलेले पाहायवयास मिळतात म्हणून मराठी साहित्यात ना.धो.महानोर व इंद्रजीत भालेराव यांची कविता इतर ग्रामीण कवितेपेक्षा मानवी जीवनाचे समृद्ध आणि सशक्त चित्रण करणाऱ्या ग्रामीण कविता निर्माण केल्या आहेत.

ग्रामीण साहित्यात ग्रामीण कवी आत्मअनुभूतीतून कविता निर्माण केल्या पण अलिकडे ग्रामीण समाज, ग्रामीण जीवन, शेती, शेतीतील प्रश्न, शेतीवर अवलंबून असणाऱ्याचे प्रश्न या प्रश्नांची गुंतागुत नित्य वाढत चालली आहे. त्यामुळे नवीन युगातल्या ग्रामीण कविवर या बदलत्या परिस्थितीचा परिणाम पहायला मिळतो. पूर्वीचे म्हणजे ना.धो.महानोर व इंद्रजित भालेराव

यांच्या कवितेतील वास्तव व दाहाक अनुभव आज ही आहेत पण आजचा ग्रामीण कवी हा जागतिकीकरणात व संगणक युगात बदलेले प्रश्न व समस्या घेऊन कविता जन्मास घालत आहे. आजचा शेतकरी रूंभण्यावर एक हात ठेऊन मोबाईलचा वापर करणारा आधुनिक शेतकरी त्याच्या ही व्यथा, वेदना कांहीशा वेगळया स्वरुपात आधुनिक कवी मांडत आहेत. आज ग्रामीण भागातील शेतकरी आधुनिक पद्धतीने शेती करुन सरकार व भांडवलदाराच्या विरोधात उभा टाकताना त्याचे चित्रण ही कविने केले आहे. आजचा शेतकरी हा आत्महत्या करुन मरणारा नाही तर आपल्या न्याय हक्कासाठी कधी कधी आपल्या छातीवर गोळी झेलायला तयार झाला आहे. त्याचे चित्रण कांही ग्रामीण कवी अतिशय संवेदनशील मनाने बदलते संदर्भ घेऊन ग्रामीण कविता निर्माण होत आहे. शेतकरी बापाने शेती केली पण शेतकरी बापाचं पोरगं शेती करण्याऐवजी ग्रामीण भागात राजकारण व ऐश आरामाच्या गोष्टी करताना बदलेल्या सामाजिक जीवनाचे संदर्भ अलिकडच्या काळात सद्यस्थितीत कांही ग्रामीण कविने आपल्या कवितेत चित्रण केले आहे. १९९० च्या दशकानंतर जागतिकीकरणाचा शेतकऱ्यांवर झालेला परिणाम व आजचा मोडकळीस आलेला शेतकरी जीवनाचे चित्रण ही ग्रामीण कवितेत आले आहे. आज ग्रामीण साहित्यात पूर्वीच्या काळातील बलुतेदारी पद्धत नवे रुप धारण करुन शेत मजूर, बलुतेदार, अलुतेदार,शेतीवर जीवन जगण्याऱ्याचे संदर्भ ही बदले म्हणून आज सर्व घटना घडामोडीचा परिणाम ग्रामीण कवितेवर पडला व त्या कवितेची भाषा बदलेली पहावयास मिळते. एकाहत्तर-बहात्तरच्या दुष्काळाचे चित्रण बऱ्याच कवीने अधोरेखित केले पण आजचा बदलेला निसर्ग वर्ष - दोन वर्षाला पडणारा दुष्काळ त्यामुळे ग्रामीण माणसांचे हाल व शेतकरी आत्महत्या करतानांचे चित्रण सध्याच्या ग्रामीण कवितेत दिसून येते.

**संदर्भ सूची**

१. कोत्तापल्ले नागनाथ, ग्रामीण साहित्य: स्वरुप आणि शोध, मेहता प्रकाशन पुणे.
२. डॉ.गुंदेकर श्रीराम, ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन, दिलीप प्रकाशन, पुणे.
३. डॉ.प्र.जी.लुलेकर, साहित्याचे वर्तन आणि वर्तमान, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
४. द.ता.भोसले, ग्रामीण साहित्य एक चिंतन, मेहता प्रकाशन, पुणे.
५. आनंद यादव, ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या, मेहता प्रकाशन, पुणे.
६. प्रा.मारोती घुगे, इंद्रजीत भालेरावाची कविता, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.